. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें.
विषय "बा-वा"
दा. क्र. 3093

# ली प्राणी

3093



BVBK-0403013

ुस्तक दुसरें

ठिगळे बंधू

प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांकरितां लिहिलेलें

# जंगली प्राणी

पुस्तक दुसरें

वा·वा· 3093 २८/७/०१

बाल वाङ्मय विभाग
3093 दिनांक २८/७/०१
वा.वा.

लेखक

वि. मा. ठिगळे, बी. ए., बी. टी.
शिक्षक, अहमदनगर एज्युकेशन सोसायटी हायस्कूल, अहमदनगर.

व

रा. मा. ठिगळे
मुख्याध्यापक, प्राथमिक शाळा, राहुरी.

---

पहिली आवृत्ति १९४७

---

BVBK-0403013

किंमत [illegible]

# लेखकाचे दोन शब्द

•••०○०•••

प्राथमिक शाळांच्या नवीन अभ्यासक्रमास अनुसरून बालवाङ्मय निर्माण करण्याचे हेतूनें आम्हीं इ. १ ते ४ करितां 'पाळीव प्राणी,' 'जंगली प्राणी', 'विषारी प्राणी', 'देशोदेशींचे प्राणी' हीं पुस्तकें लिहिलीं असून हें पुस्तक त्यांतीलच एक आहे. नवीन अभ्यासक्रमांत सामान्यज्ञान, वाक्यरचना वगैरे नवीन विषयांचा समावेश केलेला आहे हे सर्व विषय या पुस्तकांत मुलांच्या सहजप्रवृत्ति लक्षांत घेऊन हाताळलेले आहेत.

मुलें अगदीं लहानपणापासून प्राणी पाहातात, त्यांच्या गोष्टी ऐकतात, पुष्कळसे प्राणी त्यांना आवडतात देखील; पण त्यांचा स्वभावविशेष, शरीरविशेष, व जीवनक्रम त्यांना माहीत नसतो. ही माहिती त्यांना कोणी पुरवीतहि नाहीं. सबब ही सर्व माहिती सामान्यज्ञानाचे दृष्टीनें येथें दिली आहे. ही माहिती देतांना मुलांची निरीक्षण-शक्ति, स्मरण-शक्ति, कल्पना शक्ति व विचार शक्ति वाढविण्याची खबरदारी घेतली आहे.

वाक्यरचनेच्या दृष्टीनें मुलांना कोणत्याहि प्राण्याविषयीं माहिती लिहीण्यास सांगितल्यास तीं ठराविक वाक्यें लिहितात. उदाहरणार्थ, कुत्र्याविषयीं माहिती विचारल्यास 'कुत्र्याला चार पाय असतात, दोन डोळे असतात, दोन कान असतात, एक शेपूट असतें, तो वरणभात खातो.' वगैरे ठराविक साच्याचीं वाक्यें तीं लिहितात. वास्तविक कोणताहि चतुष्पाद प्राणी घेतला तर त्याला वरील वर्णन लागू पडेल. एकादा अपवाद सोडल्यास प्राण्यांना सामान्यतः चारच पाय असतात, दोनच डोळे असतात, एकच शेपूट असतें. पृथ्वीतलावर तिसरा डोळा शंकराशिवाय दुसऱ्या कोणालहि नाहीं. आणि ता उघडतो तोहि कधींकाळीं रागावल्यावर. एवढा मोठा हनुमान, पण त्याला शेपूट एकच. तें लांब असेल कदाचित्, पण होतें एकच. सारांश अशा ठराविक सांचाच्या वाक्यरचनेमुळें प्राण्यांचें खरेंखुरें ज्ञान मुलांना होत नाहीं. प्राण्यांतील विशेष शोधून काढून ते वाक्यरचनेंत गोवण्याची दृष्टि मुलांना आली पाहिजे. कुत्र्याविषयींचेच विशेष लिहावयाचे झाल्यास

'कुत्र्याचें शेपूट वांकडें असतें, त्याला हाड चघळणें आवडतें, तो इमानी असतो वगैरे' अशीं सुंदर वाक्यें लिहितां येतील. वाक्यरचनेची ही विशेष दृष्टी या पुस्तकाचे वाचनानें मुलांना सहज येईल, असा भरंवसा आहे.

नवीन अभ्यासक्रमांतील निरनिराळ्या विषयांच्या सांच्यांत ही प्राण्यांची माहिती बसवितांना पुस्तक रुक्ष व कंटाळवाणें होऊं नये म्हणून आत्मकथन, चित्रवाचन, नाट्यछटा, संवाद या व अशा भाषेच्या निरनिराळ्या अंगांचा व उपांगांचा भरपूर उपयोग केला आहे. त्यांमुळें पुस्तक चटकदार व मनोरंजक झालें आहे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे नवीन अभ्यासक्रम व बालवाङ्मय यांना सुंदर मिलाफ या पुस्तकांत झाला असून तें पुरवणी वाचनास अतिशय उपयुक्त ठरेल, असें आम्हांस वाटतें. पुरवणी वाचन म्हणून जास्तींतजास्त मुलांच्या हातांत हें पुस्तक जाऊन आम्हांस बालसेवा घडो एवढीच आमची इच्छा.

लेखक

---

# अनुक्रमणिका


| घड्याचें नांव | पृष्ठ |
|---|---|
| १ हत्ती | १ |
| २ उंट | ५ |
| ३ सिंह | ८ |
| ४ वाघ | १२ |
| ५ रानडुकर | १६ |
| ६ वानर | २१ |
| ७ अस्वल | २४ |
| ८ हरण | २७ |
| ९ कोल्हा आणि लांडगा | ३१ |
| १० ससा | ३७ |

# आमचें प्रकाशन

शिक्षण-क्षेत्रांत अनुभवलेले आमचे बंधु श्री. श्री. मा. ठिगळे, एम्. ए, एल्एल्. बी., बी. टी. यांच्या खास देखरेखीखालीं तयार झालेलीं पुस्तकें.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | पक्ष्यांची ओळख | भाग १ | ( इयत्ता १ करितां ) |
| २ | ,, ,, | भाग २ | ( इयत्ता २ करितां ) |
| ३ | ,, ,, | भाग ३ | ( इयत्ता ३ करितां ) |
| ४ | ,, ,, | भाग ४ | ( इयत्ता ४ करितां ) |
| ५ | पाळीव प्राणी | | ( इयत्ता १ करितां ) |
| ६ | जंगली प्राणी | | ( इयत्ता २ करितां ) |
| ७ | विषारी प्राणी | | ( इयत्ता ३ करितां ) |
| ८ | देशोदेशींचे प्राणी | | ( इयत्ता ४ करितां ) |
| ९ | लोकगीतें–संग्रह | | ( आबालवृद्धांकरितां ) |

पत्ता — मेसर्स जोशी आणि लोखंडे

३३५ शनवार पेठ, पुणें २.


Printed by P. B. Kale at Pratibha Press, 335 Shanwar, Poona 2.
Published by D. S. Joshi and D. B. Lokhande, Proprietors
Messrs Joshi and Lokhande, Poona 2.

# जंगली प्राणी

इयत्ता २ री

चा
विभाग.

## १ हत्ती (चित्रवाचन)



अरे बापरे ! केवढें धूड हें ! तें त्याचें अगडबंब पोट, वाटोळ्या खांबासारखे जाड जाड पाय आणि सुपाएवढे मोठमोठे कान पाहिले, म्हणजे भीति वाटते त्याची मनांत. एवढ्या पायांत किती शक्ति असणार ! म्हणून तर एकाद्याला मारावयाचें असल्यास हत्तीचे पायाखालीं देत असावेत.

पण तोंडापासून खालीं लांबचे लांब काय लोंबत आहे ? त्याचें नाक वाटतें. त्याला सोंड म्हणतात. ती सोंड पोकळ आहे. तिच्यांत हाड नसल्यामुळें ती त्याला पाहिजे तशी वळवितां येते. सोंडेच्या शेवटीं खालीं चिमट्यासारखा आकाराचा भाग आहे ना ? त्यानें तो अगदीं बारीक सारीक पदार्थहि उचलून घेऊं शकतो. सोंडेनेंच तो पाणी पितो. सोंडेंतच पाणी भरून मग तो पंपाप्रमाणें आपले तोंडांत सोडतो. त्याचे सोंडेंत विलक्षण शक्ति आहे. तिनें तो झाडें-सुद्धां उपटतो.

वर सोंडेच्या दोन्हीं बाजूंस तोंडांत त्यानें तलवारी कशाला धरल्या आहेत ? अहो, त्या तलवारी नाहींत. ते त्याच्या वरच्या जबड्यांतील दांत आहेत. एका-द्याच्या पोटांत हे दांत खुपसले, कीं तो मेलाच म्हणून समजा. हे दांत कापून त्यांच्या फण्या, कंगवे, बांगड्या, गुंड्या, चाकूच्या मुठी, देवाच्या मूर्ति, वगैरे तयार करतात. या हस्तिदंती वस्तु महाग असतात.

बाकी हत्तीचें पोट, सोंड व सुळे पाहून गणप-

तीची आठवण होते, आणि वाटतें हा गणपतीचा बाप तर नसेल ?

शरीराचे मानानें त्याचे डोळे फार बारीक आहेत नाहीं ? अन् किती लाल आहेत ते ! जणूं काय रागा-वलाय खूप. त्याचें शेपूट पण लहानच. मारुतीच्या शेपटासारखें त्याचें शेपूट लांब असतें, तर किती मजा झाली असती ! शेपटीनें वर चढायचें आणि सोंडेनें खालीं उतरायचें. जसे कांहीं दोन्ही बाजूंस दोन जिनेच.

हत्तीला पाहून कल्पना येते, कीं सात आंधळे कसे फसले असतील. आंधळेच पण काय डोळससुद्धां फसतील याच्या अजस्त्र शरीराला.

शरीराप्रमाणेंच त्याचें खाणें पिणेंहि भरपूर आहे. ओलें गवत, वाळलेलें गवत, झाडपाला, कांहीं पुरत नाहीं त्याला. पाळलेल्या हत्तीस कडबा, ऊस, कण-केचे रोट, वगैरे खाऊं घालतात. बाकी हत्ती पाळावयाचा म्हणजे विचार करूनच पाळायला पाहिजे. कारण खाऊन खाऊन तो मालकाचें दिवाळेंच काढायचा.

म्हणून राजे, सर्कसवाले आणि श्रीमंत लोकच त्याला पाळतात. ते म्हैसूरहून हत्ती मागवतात. कधीं कधीं आफ्रिकेंतूनसुद्धां मागवतात. कारण तेथें हत्तींची निपज चांगली होते.

हत्तीला शिकवावें तसें तो शिकतो. सर्कशींत त्याचेकडून चांगलीं कामें करून घेतात. राजे हत्तीवर अंबारी घालून स्वारी शिकारीस जातात. हत्ती ही ऐश्वर्याची खूण आहे. स्वारी शिकारीस जातांना तोही मोठ्या ऐटींत हालत, डुलत मंदगतीनें चालतो. पण एकदां उधळला कीं, तो फारच जलद पळतो. मग त्याला थांबविण्यास महाताला फार त्रास पडतो. केव्हां केव्हां अंकुश टोचावे लागतात त्याच्या डोक्यांत त्याकरितां. म्हणून तर म्हणतात,

ऐरावती रत्न थोर । त्याला अंकुशाचा मार ।

### प्रश्न

१ हत्तीच्या अगडबंब शरीराचें वर्णन करून त्याचें खाणें, पिणें सांगा.

२ हत्तीचा उपयोग काय ? त्याचीं हत्यारें कोणतीं ?

३ 'हत्ती आणि सात आंधळे ही गोष्ट सांगा.'

४ ( अ ) हत्तीची सोंड·········व·········असते.

( ब ) हत्तीचे पाय खांबासारखे·················त्याचे कान सुपासारखे······असतात.


( क ) हत्तीचे डोळे·········व शेपूट·········असते.

५ म्हणजे काय ?

महाल, अंबारी, अंकुश, हस्तीदंत, गंडस्थळ.

---

## २ उंट ( आत्मकथन )



मी एक दुर्दैवी प्राणी आहें. देवानें जन्मतःच मला
…लें. नाहींतर त्यानें मला सुंदर नसतें का
… सिंह, घोडा, कुत्रा या सर्वांना त्यानें

म्हणून राजे, सर्कसवाले आणि श्रीमंत लोकच त्याला पाळतात. ते म्हैसूरहून हत्ती मागवतात. कधीं कधीं आफ्रिकेंतूनसुद्धां मागवतात. कारण तेथें हत्तींची निपज चांगली होते.

हत्तीला शिकवावें तसें तो शिकतो. सर्कशींत त्याचेकडून चांगलीं कामें करून घेतात. राजे हत्तीवर अंबारी घालून स्वारी शिकारीस जातात. हत्ती ही ऐश्वर्याची खूण आहे. स्वारी शिकारीस जातांना तोही मोठ्या ऐटींत हालत, डुलत मंदगतीनें चालतो. पण एकदां उधळला कीं, तो फारच जलद पळतो. मग त्याला थांबविण्यास महाताला फार त्रास पडतो. केव्हां केव्हां अंकुश टोचावे लागतात त्याच्या डोक्यांत त्याकरितां. म्हणून तर म्हणतात,

ऐरावती रत्न थोर । त्याला अंकुशाचा मार ।

### प्रश्न

१ हत्तीच्या अगडबंब शरीराचें वर्णन करून त्याचें खाणें, पिणें सांगा.

२ हत्तीचा उपयोग काय ? त्याचीं हत्यारें कोणतीं ?

३ 'हत्ती आणि सात आंधळे ही गोष्ट सांगा.'

४ ( अ ) हत्तीची सोंड..........व..........असते.

( ब ) हत्तीचे पाय खांबासारखे....................त्याचे कान सुपासारखे......असतात.


( क ) हत्तीचे डोळे.........व शेपूट..........असते.

५ म्हणजे काय ?

महात, अंबारी, अंकुश, हस्तीदंत, गंडस्थळ.

---

## २ उंट ( आत्मकथन )



मी एक दुर्दैवी प्राणी आहें. देवानें जन्मतःच मला दुर्दैवी केलें. नाहींतर त्यानें मला सुंदर नसतें का केलें ? वाघ, सिंह, घोडा, कुत्रा या सर्वांना त्यानें

ऐटदार केलें, सुंदर केलें. मला मात्र हें वांकडेंतिकडें अन् कुरूप शरीर. पोट भलें मोठें आणि पायांच्या मात्र काड्या. मान लांबलचक आणि शेपूट आखूड. एवढ्या मोठ्या शरीराला तोंड पहावें तर चिमणीसारखें लहान. कांहीं शोभत नाहीं. माझी मलाच लाज वाटते.

सुंदर शरीर तर नाहींच. पण सुख देखील नाहीं माझे कपाळीं जन्मापासून. जन्माला घातलें मला तेंहि अगदीं रुक्ष ठिकाणीं. कोणाचा जन्म गुहेंत, कोणाचा गोठ्यांत, तर कोणाचा तबेल्यांत. माझा मात्र वाळवंटांत. पाणी देखील सांपडावयाचें नाहीं तेथें. खालीं वाळूचा आधार आणि वर आभाळाचें झाकण. माझ्या मायभूमींत-अरबस्तानांत-कंटाळा आला राहायचा. म्हटलें फिरावें जगांत आणि मिळवावी जागा चांगली; पण कसलें ? सगळ्या जागा मिळाल्या त्या वाळवंटाच्या. सहारा काय, पश्चिम अशिया काय, किंवा वायव्य हिंदुस्तान काय, सगळीं वाळवंटें. आतां आस्ट्रेलियांत जाऊन पहातों. तेथेंहि वाळवंटच आमच्या नशिबाला.

बरें जागेविषयीं कुरकुरायला गेलों तर पुन्हा म्हणायला तयार कीं, " तूं उगाच कुरकुरतोस " तुला चांगलें सपाट तळपाय दिले आहेत. ते कधीं वाळूंत रुतायचे नाहींत. आणखी तुला मदार दिली आहे. तींत चरबी साठव, कोठ्यांत एकदम तीन तीन दिवसांचें पाणी साठव. म्हणजे तुला कांहीं त्रास होणार नाहीं.

असा उपदेश करणें सोपें असतें. त्याप्रमाणें वागणें कठीण जातें. अहो, वाळवंटांत कित्येक दिवस पाला दिसत नाहीं, कीं पाणी दिसत नाहीं. मग चरबी आणि पाणी साठवावयाचें कोठून ! एकादें ओयासीस पाहिलें कीं, घ्यावें लागतें आधाशाप्रमाणें पाणी पिऊन. कांटेरीं झुडपें खाऊन दिवस काढावे लागतात. करता काय ? जगायला पाहिजे ना कसें तरी करून ?

बाकी मी मेलों तर कोणाला वाईट वाटणार नाहीं. वाईट वाटेल तें त्यांचें काम अडल्याबद्दल. त्यांची गैरसोय झाल्याबद्दल. मी आहें म्हणून वाळवंटांतून त्यांना मालाची ने-आण करतां येते. व्यापार करतां येतो.

दुसऱ्या कोणाची ताकद आहे पाठीशीं ओझें घेऊन वाळू तुडवायला आणि त्यांचे उपयोगी पडायला? असें असलें तरी मी त्यांना दूध देतों प्यायला. माझ्या केसांचे कपडे देतो पांघरायला आणि उपाशी मरण्याची वेळच आली मालकाला, तर स्वतःचा जीव देऊन त्याला जगवितों. मी मुळीं ठरविलें आहे कीं, कितीही दुःखी असलों तरी दुसऱ्याला सुखी करावयाचें. जिवाची परवा करावयाची नाहीं.

### प्रश्न

१ उंट कोणत्या देशांत आढळतात? ते काय खातात?

२ उंटाच्या शरिराचे विशेष भाग कोणते? वाळवंटांतील प्रवासाला ते कसे उपयोगी पडतात?


३ उंट दुर्दैवी कसा? तो मनुष्याला सुखी करतो कसा?

४ उलट अर्थाचे शब्द द्या—सुंदर, लांब, ओला, सुखी व सुदैव.

## ३ सिंह (माहिती)

सर्व प्राण्यांमध्यें सिंह थोर मानतात. कारण सिंहाइतका शूर, शक्तिमान्, उग्र व रुबाबदार प्राणी दुसरा नाहीं. एवढा मोठा हत्ती, पण त्याला देखील हा

सळा कीं, पळो करून सोडतो. म्हणून सिंहाला जंगलचा राजा म्हणतात.



सिंह दहा फूट पर्यंत लांब असतो. त्याचें वजन पांचशें पौंड सुद्धां भरत असतें. त्याचा रंग पिंगट असतो. कांहीं सिंह फिकट पिवळे असतात, तर कांहीं गर्द पिवळे असतात. त्याचा जबडा मोठा असतो. डोळे क्रूर पण तेजस्वी असतात. नराच्या मानेवर लांब, राठ व दाट केस असतात. त्यांस आयाळ म्हणतात. घोड्याच्या आयाळीपेक्षां सिंहाची आयाळ सुंदर दिसते. आयाळीमुळें सिंह भव्य दिसतो.

सिंहाचें शेपूट गोंडेदार असतें. त्यामुळें शेपटाजवळचा सर्व भाग झाकून जातो. सिंहाच्या पायांस नखें असून तीं फार तीक्ष्ण असतात.

सिंहाच्या पिलास छावा म्हणतात. छाव्याचा रंग सिंहासारखाच असतो. पण लहानपणीं त्याचे अंगावर पट्टे असतात. हे पट्टे तो मोठे झाल्यावर आपोआप नाहींसे होतात.

ससा, सांबर, हरीण, कोल्हा, लांडगा, वगैरे प्राणी सिंह खातो. गुरेंही खातो. मनुष्याच्या वाटेस सहसा तो जात नाहीं.

सिंह विशेषतः आफ्रिका व आशिया खंडांत सांपडतात. आपल्या हिंदुस्थानांत काठेवाडांतील रानांत व हिमालयाच्या पायथ्याशीं त्यांची वस्ती आहे.

सिंहाच्या आरोळीस सिंहनाद म्हणतात. सिंहनादानें सर्व रान दुमदुमून जातें. सिंहाची शिकार करणें अतिशय धाडसाचें काम आहे. रानडुक्कर, वाघ वगैरे हिंस्र पशूंची शिकार केलेली आपण वरचेवर ऐकतों

गांवोगांव अस्वलास घेऊन फिरतो व त्याचे खेळ करतो. लोक त्याला पैसे देतात. त्या पैशावरच तो पोट भरतो. दरवेशींचें पोट पैशानें भरतें. तुमचें पोट ज्ञानानें भरतें. होय ना? मग खालील प्रश्नांचीं उत्तरें द्या पाहूं.

### प्रश्न

प्रश्न—१ अस्वलाचे डोळे, शेपूट व पंजे कसे असतात?

२ अस्वलाचें खाणें काय? खाणें शोधण्याचे कामीं त्याला नाकाचा काय उपयोग होतो?

३ अस्वलाचे प्रकार कोणते?


४ अस्वलाचे तावडींतून सुटका करून घेतल्याबद्दलची एकादी गोष्ट सांगा.

---

## ८ हरण (माहिती)

हरण हा प्राणी अतिशय चपळ आहे. तें नेहमीं टुण टुण उड्या मारीत पळतें. तें इतकें जलद पळतें कीं, त्याचेवर नजरसुद्धां ठरत नाहीं. हरणाचा कळप रानांत पळूं लागलेला दिसला, म्हणजे मनाला आनंद होतो.

3093 का.वा.



हरणाचे अंगावर बारीक बारीक व नाजूक त्वचा असते. त्याचे पाय बारीक असतात. पायांना खूर असतात. मानही साधारण बारीक असते. शरीराचे मानानें कान जरा मोठे असतात. त्याचीं शिंगें मात्र फार लांब असतात. विशेष म्हणजे हरणाचीं शिंगें दरवर्षी गळून पडतात आणि त्या ठिकाणीं नवीन येतात. हरिणीला शिंगें नसतात.

हरण अतिशय गरीब असतें. तें कधीं कोणाला त्रास देत नाहीं. रानात जें मिळेल तें तें खातें. गवत खातें, झाडापाला खातें, फळफळावळ खातें,

श्री. अरुण [illegible]

सर्व कांहीं खातें. पण त्या करितां तें कोणाचा प्राण घेत नाहीं.

हरण जरी कोणाला त्रास देत नसलें तरी त्याला मात्र सगळे त्रास देतात. त्याला त्रास देण्यांत वाघाचा पहिला नंबर लागतो. वाघाला हरणाचें रक्त व मांस फार आवडतें. म्हणून वाघ नेहमीं हरणाच्या मागें लागतो. हरणाचें मांस माणसेंहि आवडीनें खातात. त्या करितां तीं हरणाची शिकार करतात. सगळे गरीबांचे काळ.

जगांत सर्व ठिकाणीं हरण आहेत. फक्त दक्षिण आफ्रिका व आस्ट्रेलिया या देशांत ते नाहींत. ग्रेट-ब्रिटनमध्यें हरणाच्या दोन तीन जाती आहेत. त्यांपैकीं तांबड्या हरणाची जात स्कॉटलंडमध्यें आहे.

स्कॉटिश लोकांना हरणांचा फार शोक आहे. ते हरणाचें मोठ मोठे कळप पाळतात. हरणांना चरण्या-करितां त्यांनीं तीन लक्ष एकर जमीन राखून ठेविली आहे. तेथें हरण चरतात. हरणांना निरनिराळ्या प्रकारचे खेळ ते शिकवितात. त्यांपैकीं ‘ लुटपुटीची

शिकार ' हा खेळ सर्वांना आवडतो. हा खेळ म्हणजे हरण असतील तेथें घोडे सोडणें व घोड्यांच्या आड राहून त्यांना पकडणें.

आपल्या इकडे जशा घोड्यांच्या शर्यती असतात, तशा तिकडे हरणांच्या शर्यती लावतात. ऐटीनें चालण्याची शर्यत, सावकाश पळण्याची शर्यत, जोरानें पळण्याची शर्यत, अशा नाना प्रकारच्या शर्यती लावतात. तुम्हांला त्यांच्या हरणांच्या शर्यती पाहाव्याशा वाटतात ना? मग लवकर शिका, मोठे व्हा आणि जा स्कॉटलंडांत त्या बघायला हरणा-सारख्या टुण टुण उड्या मारीत.

## प्रश्न

प्रश्न १. हरण कोणत्या देशांत आहेत? कोणत्या देशांत नाहींत?

२. स्कॉटिश लोकांना हरणांचा शोक आहे. कशा वरून?

३. हरणांचे शत्रू कोण? कां?

# ९ कोल्हा आणि लांडगा ( भेट )

प्रसंग—एकदां एका कोंबडीचें एक पिलूं रानांत चुकलें. त्याला तेथें कोल्हा भेटला. कोल्ह्याला पाहून तें पिलूं भ्यालें आणि झाडावर जाऊन बसलें. कोल्ह्यास तें पिलूं खाण्यास पाहिजे होतें. तेव्हां तो म्हणूं लागला, " पिला, खालीं ये. मी तुला तुझ्या घरीं नेऊन घालतों." त्यावेळीं त्या वाटेनें लांडगा चालला होता. त्यालाही पिलाचा वास आला. म्हणून तो झाडाखालीं आला. तेव्हां कोल्ह्याचें व त्याचें खालीलप्रमाणें भाषण झालें.



कोल्हा—ए कुत्र्या, तुझें काय काम आहे येथें ? चल नीघ येथून.

लांडगा—कोणाला रे म्हणतोस तूं कुत्रा ? चांगला लांडगा असून कुत्रा म्हणतोस मला ! डोळे गेलेत वाटतें तुझें ?

कोल्हा—अस्सं, अस्सं, तूं लांडगा आहेस होय ! बरें, लांडगे बुवा, उगाच रागावता कशाला ? कुत्रा म्हणालों म्हणून काय झालें ? मला तर बुवा तुमच्यांत आणि कुत्र्यांत कांहीं फरक दिसत नाहीं.

लांडगा—कांहीं फरक दिसत नाहीं तुला ? कमाल आहे बाबा तुझी. एकदां माझ्याकडे नीट बघ. हे बघ माझ्या अंगावर कसे भुऱ्या रंगाचे राठ केस आहेत. माझी मान जाड असून तिच्यावरही असेच राठ केस आहेत. कुत्र्याचे केस असे राठ नसतात. हें माझें शेपूट बघ कसें सरळ व झुपकेदार आहे तें. नाहींतर तें कुत्र्याचें शेंपूट, सदा वांकडें.

कोल्हा—आतां लक्षांत आलें. तूं खरोखर लांडगा आहेस म्हणून. पण मी असें ऐकलें होतें कीं, लांडगे

कळप करुन राहातात आणि ते शिकार शोधण्या-करितां रात्रीं फिरतात. आणि आतां आहे दुपार, तेव्हां वाटलें तूं कांहीं लांडगा नाहींस. बरें रागावूं नका हो लांडगे बुवा, माझ्या चुकीबद्दल.

लांडगा—बरोबर आहे तुझें म्हणणें कुत्रे दादा. लांडगे कळप करून राहातात. ते रात्रीचे हिंडतात.

कोल्हा—अरे, मी कुत्रा नाहीं. कोल्हा आहे.

लांडगा—खोटें बोलूं नकोस कुत्रे दादा. तूं कोल्हा नाहींस. कारण कोल्हे आमच्या सारखेच कळप करून राहातात. रात्रीं हिंडतात आणि तूं हिंडत आहेस दुपारीं एकटाच.

कोल्हा—मी एकटा हिंडत आहे खरा. पण हें माझें शरीर बघ. हें काय कुत्र्याच्या शरीरासारखें आहे.

लांडगा—कुत्रे सुद्धां तुझ्यासारखे फूट दीड फूट उंच असतात. तीन चार फूट लाब असतात. त्यांचें वजनही तुझ्या वजना इतकेंच पंधरा वीस पौंड असतें.

कोल्हा—खूप शहाणा दिसतोस. तूं! बुसती

लांबी, उंची, वजन सारखें असलें म्हणजे झालें वाटतें. इतर गोष्टीही बघाव्या लागतात. कुत्रे निरनिराळ्या रंगांचें असतात. कोल्ह्याचा रंग मात्र माझ्या रंगासारखा तांबूस तपकिरीच असतो. आमच्या अंगावरील केसांचीं टोकें पांढरीं असतात. तसेंच कुत्र्याच्या आणि आमच्या खांद्याच्या हाडांतहि फरक असतो. शिवाय आमच्या पापण्या वाकलेल्या असतात. कळलें कां तुला आतां कुत्र्यांत आणि कोल्ह्यांत काय फरक आहे तो ?

लांडगा—कळलें आतां, माफ करा. तुम्हाला कुत्रा म्हटल्या बद्दल कोल्हेकाका.

कोल्हा—अहो, कसली माफी घेऊन बसलात ? मला कोणीं कांहीं म्हणलें तरी चालतें. राग येत नाहीं. पण काय हो, लांडगे बुवा, आज इकडे कोणीकडे ?

लांडगा—चाललों होतों भटकत. इतक्यांत इकडून कोंबडीच्या पिलाचा वास आला नाकाला. माझें नाक फार तीक्ष्ण आहे. तेव्हांच वास येतो, कसलाहि त्याला. तेव्हां आलो इकडे. म्हटलं साधावी शिकार.

कोल्हा—शिव, शिव, तुम्ही कोंबडी खातां ?

मांस खाता ? मी भुईमुगाच्या शेंगा खाईन, राताळीं खाईन, गाजरें खाईन, ऊस खाईन, सगळें खाईन, पण मांसाला शिवणार नाहीं.

लांडगा—पुरें, पुरें करा अशा थापा मारणें. कोल्हेकाका, मांस खाऊन दांत किटले असतील तुमचे. उगाच खोटें बोलूं नका. बाकी कोल्ह्याची जातच लबाड. मला लबाडी करणें बिलकूल आवडत नाहीं. माझ्या जिवावर बेतलें तर भित्र्याप्रमाणें पळून जाईन, पण लबाडी करणार नाहीं.

कोल्हा—लांडगेबुवा, मी लबाडी करीत नाहीं. मी खरेंच मांस खात नाहीं.

लांडगा—नसशील खात. मला काय करायचें ? पण काय हो, मग वर झाडाकडे बघत कां उभा राहिला होतास ? आणि त्या पिलाबरोबर कशा करितां लाडी गोडी लावीत होतास ?

कोल्हा—( मनांत ) या लांडग्यानें आपला बेत ओळखला दिसतो. आतां त्याला येथून हाकून देण्याची

युक्ति केलीच पाहिजे. ( लांडग्यास ) ते पहा शिकारी कुत्रे आले. पळा, नाहींतर फाडून खातील आपणाला.

( लांडगा पळून जातो. कोल्हा पळाल्या सारखें करतो. लांडगा व कोल्हा दूर गेले असें पाहून कोंबडीचें पिलूं खालीं उतरतें. इतक्यांत लबाड कोल्हा परत येऊन त्याचेवर झडप घालुन त्यास पकडतो.)

### प्रश्न

प्रश्न—कोल्हा आणि कुत्रा यांच्यामध्यें फरक काय ?

२ लांडगा आणि कुत्रा यांच्यामध्यें फरक काय ?

३ कोल्हे आणि लांडगे केव्हां फिरतात ? कशा करितां ?

४ कोल्ह्याच्या लबाड स्वभावाविषयीं एकादी गोष्ट सांगा.


५ उलट अर्थाचे शब्द द्या—

लबाड, राठ, भित्रा, वाकडा, जाड, रात्र, पांढरे.

६ म्हणजे काय ?

लांडीगोडी लावणें, डोळे जाणें, माफी देणें, थापा मारणें, दांत किटणें, जिवावर बेतणें.

# १० ससा ( नाव्यछटा )



काय म्हणता ? मी सुंदर आहें ? आहेच मी सुंदर. तें तुम्ही कशाला म्हणायला पाहिजे ? माझें शरीर सांगेल सर्वांना, कीं मी सुंदर आहें म्हणून. हें पहा माझें अंग. कसे गोरें गोरें पान आहे. त्यावर पांढरे मऊ मऊ केस, छोटें छोटें शेपूट, मोठे मोठे कान. कान मोठे असले तरी शोभून दिसतात मला. त्यांतच दुभागलेल्या वरच्या ओठाची आणि या दोन हिऱ्यांची ( डोळ्यांची ) भर. मग काय सौंदर्याला कमी! शेपूट गोरें, कान गोरे, पाय गोरे, सगळेंच गोरें. लांबून पाहिल्यास कापसाचा गोळाच वाटेल मी कोणाला.

तुम्हीच साहिले होतां मला लहान म्हणायचें. अहो, लहान तरी कसें म्हणता ? चांगला दोन फूट लांब आहे मी. सात, आठ पौंड वजन आहे माझें आणि समजा, असलों लहान तर गुणांत कांहीं कमी नाहीं. एकदा धांवायला लागलों तर कोणच्या बाला नाहीं ऐकणार. माझे मागचे पाय उपयोगी पडतात मला पळण्याच्या कामीं. नुसते मोठे होऊन तरी काय उपयोग. तुमचे हत्ती महाराज पुष्कळ मोठे आहेत. पण चालतात डुलत डुलत, जसं कांहीं हातापायावरून वारं गेलंय.

आलों असेन मसणांतून मी. कोठून आला, कोठें रहातो, सतरा पंचायती करायची संवयच लागली या मनुष्यप्राण्याला. अरे बाबा, मी येथें या रानांत रहातो. दिसत नाहीं वाटतें ? अस्सं अस्सं, कोणत्या देशांतून आलों आहे म्हणता ? सांगतों ऐका. माझी वस्ती जगांतील सगळ्या देशांत आहे. फक्त आस्ट्रेलियांत नाहीं. कारण तो देशच मुळीं तसा आहे. तेथें उंट नाहीं, हरण नाहीं, कोणी नाहीं. मग मीच

कशाला जाऊं मरायला. आणि जाऊं लागलों तर मला कोणी येऊंहि देणार नाहीं. कारण तेथें आहेत सगळे गोरे आणि मी आहें त्यांच्यापेक्षां अधिक गोरा. मग माझें गोरेपण त्यांना कसें आवडणार ? तसे गोरे लोक फार चांगले. ते माझ्या जातभाईला सांभाळतात. त्यांना खाऊं पिऊ घालतात, खेळ शिकवतात, सर्व कांहीं करतात.

काय ? तुम्ही पण मला तुमचे घरी चल म्हणतां ? नको रे बाबा. मला तुमचें घर नको, फळें नकोत, भात नको, भाकरी नको, कांहीं नको. मी येथें रानांत राहीन, गवत खाईन, पण तुमच्या बरोबर येणार नाहीं. उगीच लाडी गोडी लाऊं नका. मला माहीत आहे माणसाची जात किती लबाड आहे तें. न्याल गोड गोड थापा मारून आणि काढाल काटा माझा. माझें मांस खातांना मात्र माराल बाता कीं, मी सशाला असें पकडलें अन् तसें मारलें म्हणून. मला सगळें माहीत आहे. काय ? भाला रोखूं लागलात माझ्याकडे ? मला मारायला पहातां ? माझाच अंदाज

खरा ठरला. मी तुमच्या देवाच्या सुद्धां हातीं लागणार नाहीं. ( ससा पळून जातो. )

### प्रश्न

प्रश्न—१ ससा कोणत्या देशांत आढळतो? तो सुंदर कां दिसतो?

२ ससा केवढा असतो? तो काय खातो? माणसें त्याला कशाकरितां पकडतात?

३ सशाच्यां चपळतेची एकादी गोष्ट सांगा.

४ म्हणजे काय?:—कांटा काढणें, बाता मारणें, वारें जाणें,


म. गां. सं. कार्ड, बालमालय ग्रंथ
बाल वाङ्मय विभाग.
दा. क्र. 3073 दिनांक 24/4/57
विभाग बा.वा. क्र. ........
BVBK-0403013